# फ्लिपकार्टकडून फर्निचर पोर्टफोलिओचे बळकटीकरण सुरूच; फ्लिपकार्ट परफेक्ट होम्स ज्यूनिअरसह स्थानिक पातळीवर बनवलेल्या लहान मुलांच्या फर्निचर क्षेत्रात प्रवेश

- नव्या श्रेणीत २ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी फर्निचर उपलब्ध
- भारतात बनवलेले हे फ्लिपकार्ट परफेक्ट होम्स ज्युनिअर म्हणजे गुणवत्ता आणि सुरक्षिततेची हमी

**बंगळुरू, १५ जून २०२० :** फ्लिपकार्ट या भारतात विकसित झालेल्या ई-कॉमर्स बाजारपेठेने आज आपल्या व्यासपीठावरील फर्निचरच्या श्रेणीचा आणखी विस्तार करत फ्लिपकार्ट परफेक्ट होम्स ज्यूनिअर या श्रेणीच्या शुभारंभाची घोषणा केली. भारतातच बनवलेल्या या फर्निचरमध्ये खास लहान मुलांसाठीचे बेड्स, स्टडी डेस्क्स, किड्स सीटींग/टेबल आणि चेअर सेट, तसेच स्टोअरेज/वॉर्डरोब्ज यांचा समावेश आहे. मुलांना त्यांची स्वतंत्र जागा व फर्निचर उपलब्ध करून दिल्यास त्यांना अधिक स्वतंत्र असल्यासारखे वाटते, असे अभ्यासातून दिसून आले आहे. त्या आधारे *'फ्लिपकार्ट परफेक्ट होम्स ज्यूनिअर'* या श्रेणीअंतर्गत मुलांसाठी फर्निचरचा *केवळ आकार कमी न करता खास त्यांच्यासाठी फर्निचरची रचना* करण्यात आली आहे.

मुलांसाठीच्या या श्रेणीत भरपूर स्टोअरेज जागा व दिसायला देखण्या अशा उपयुक्त, चैतन्यदायी आणि उच्च गुणवत्तेच्या फर्निचरचा समावेश आहे. फ्लिपकार्टच्या ग्राहककेंद्री धोरणानुसार सुरक्षिततेला प्राधान्य देत परफेक्ट होम्स ज्यूनिअर रेंज विकसित करण्यात आली असून यामध्ये वर्तुळाकार कोपरे, घातक रसायनांचा वापर न करणे, मजबूत, हाताला चिमटा बसणार नाही अशा प्रकारची रचना आणि टिकाऊपणाचे प्रमाणपत्र आदी बाबींची काळजी घेण्यात आली आहे. सुरक्षितता आणि गुणवत्तेची कमाल पातळी राखली जाईल, याची खातरजमा करण्यासाठी फ्लिपकार्टच्या प्रशिक्षित गुणवत्ता चमूकडून प्रत्येक उत्पादनाची अत्यंत सखोलपणे छाननी केली जाते.

**फ्लिपकार्टच्या प्रायव्हेट लेबल्सचे उपाध्यक्ष देव अय्यर** म्हणाले, *"मुलांसाठी फर्निचरची खरेदी करताना भारतीय पालकांना असलेल्या आकांक्षा, त्यांच्या गरजा आणि चिंता या सर्वांची आम्हाला कल्पना आहे. पैशांचे योग्य मोल मिळावे आणि गुणवत्तेसाठी ते दक्ष असतात. सुरक्षितता आणि उपयुक्तता या त्यांच्या लेखी महत्त्वाच्या बाबी असून फ्लिपकार्ट परफेक्ट होम्स ज्यूनिअर श्रेणी त्यांच्या या अपेक्षांची पूर्तता करेल. विशेषत: सध्याच्या काळात सर्वांना घरात राहावे लागत असताना पालक आपल्या मुलांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देऊ पाहात असल्यामुळे या विस्तारासह आम्ही ऑनलाइन फर्निचर क्षेत्रातील आमच्या उत्पादनांचे अधिक बळकटीकरण करत आहोत."*

भारतातील शहरी तरुणांना हव्या असलेल्या देखण्या, परंतु साध्या व उपयुक्त अशा फर्निचरची गरज पूर्ण करण्याच्या हेतूने फ्लिपकार्टने फेब्रुवारी २०२० मध्ये 'परफेक्ट होम्स स्टुडिओ'चा शुभारंभ केला. ऑनलाइन फर्निचरच्या क्षेत्रात किंमत, गुणवत्ता आणि वैविध्य या संदर्भात असलेल्या त्रुटी शोधून त्या दूर करण्यासाठी ब्रँड ओळखला जातो. उत्पादनांची निर्मिती स्थानिक पातळीवर केली जाते. त्यामुळे स्थानिक कारागिरांच्या समुदायांचा विकास, रोजगाराच्या आणि उत्पन्नाच्या नव्या संधी निर्माण करण्यातही योगदान दिले जाते. फ्लिपकार्ट परफेक्ट होम्स ज्यूनिअर श्रेणीच्या माध्यमातून फ्लिपकार्ट लहान मुलांसाठीच्या फर्निचरच्या क्षेत्रात प्रवेश करत असून या उद्योग क्षेत्राच्या अहवालानुसार या श्रेणीत प्रति वर्षी २० टक्क्यांनी वाढ होत आहे.

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution. With a registered customer base of over 200 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has driven us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, and PhonePe, India's fastest growing digital payments platform, the Flipkart Group is steering the transformation of commerce in India through technology.

For more details contact media@flipkart.com.